पुणे पोलीस
Pune Police

जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर पोलीस
P.R.O. Office, Crime Branch, Pune City
**Address** – Office of The Commissioner of Police, Pune City Sadhu Vaswani Road, Pune Maharashtra – 411001
**E-Mail ID :** crimepress.pune@gov.in **Ph.**020 / 26122478

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट दिनांक - २७/०७/२०२३**

# परिमंडळ ०५ कार्यक्षेत्रांतील पोलीस स्टेशनकडील वेगवेगळयां एकुण ६५ सराईत गुन्हेगारांवर हद्दपारीची कारवाई

मा.पोलीस आयुक्त पुणे शहर श्री.रितेश कुमार यांनी पुणे शहर पोलीस आयुक्तालयांतील गुन्हेगारीवृत्तीस आळा घालणेकामी व प्रतिबंध करणेकामी पोलीस स्टेशनचे रेकॉर्डवरील व सराईत गुन्हेगारांवर परिणामकारक व ठोस अशी कारवाई करणे बाबत आदेश दिलेले होते. नमूद आदेशांप्रमाणे परिमंडळ-५ कार्यक्षेत्रांतील सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग व वानवडी विभागांचे अधिपत्याखाली येणारे वेगवेगळयां पोलीस स्टेशनकडील सराईत गुन्हेगारांचे अभिलेखाचा अभ्यास करणेत आलेला आहे. सदर अभ्यासांवरुन माहे जानेवारी २०२३ ते आज पावेतो सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार ) क.५५,५६,५७ प्रमाणेची कारवाई करणेत आलेली आहे. त्याबाबतची माहिती खालीलप्रमाणे

पोलीस उप-आयुक्त, परिमंडळ ५,पुणे शहर या कार्यालयाकडून एकुण ०७ टोळयांतील टोळी प्रमख व त्यांचे सदस्य असे एकूण २१ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार) क.५५ प्रमाणे,एकूण ४४ सराईत गुन्हेगारांवर महाराष्ट्र पोलीस कायदा (हद्यपार) क.५६,५७ प्रमाणे हद्यपारीची कारवाई करणेत आलेली आहे. नमूद प्रमाणे परिमंडळ -५ कार्यक्षेत्रांतील एकूण ६५ सराईत गुन्हेगारांना पुणे शहर,पिंपरी चिंचवड व पुणे जिल्हयांतून हद्यपार करणेत आलेले आहे. या पुढेदेखील सराईत गुन्हेगारांना गुन्हे करणे पासून परावृत्त करणेकामी व गुन्हयांना आळा घालणे व प्रतिबंध होणेचे दृष्टीकोनातून अशा प्रकारच्या कारवायां करणेत येणार आहेत.

वरील प्रमाणेचे हद्यपारीच्या कारवाया मा.पोलीस आयुक्त,पुणे शहर श्री.रितेश कुमार, मा.पोलीस सह आयुक्त,पुणे शहर श्री.संदिप कर्णिक, मा.अप्पर पोलीस आयुक्त पुर्व प्रादेशिक विभाग,पुणे शहर श्री.रंजनकुमार शर्मा, मा.पोलीस उप- आयुक्त परिमंडळ ५ पुणे शहर श्री.विक्रांत देशमुख,यांचे मार्गदर्शनाखाली व सुचनांप्रमाणे परिमंडळ-५ चे विभागीय मा.सहा.पोलीस आयुक्त,वानवडी विभाग,पुणे शहर श्री.शाहुराजे साळवे व मा.सहा.पोलीस आयुक्त,हडपसर विभाग,पुणे शहर श्रीमती अश्विनी राख यांनी व त्यांचे विभागीय पो.स्टे.कडील प्रभारी अधिकारी व निगराणी पथकांतील अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे कडून मुदतीत प्रस्ताव प्राप्त करुन घेवून परिमंडळ-५ कार्यालयाकडील वाचक पो.उ.निरी.रामकृष्ण काळे, पो.हवा.राजेंद्रकुमार ननवरे, महिला पोलीस शिपाई अश्लेषा माने यांनी केलेली आहे.